**अर्जदारचे सा. क्र. २ यांचा उलटतपास जाबदेणारतर्फे वकील ॲड श्री. एम. टी. शितोळे यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

६. माझे शिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अर्जदार हिच्यासोबत प्रत्येक तारखेस अर्जदाराला सोबत म्हणून येते. हे म्हणणे खरे आहे की, मला अर्जदार हिने आजरोजी साक्ष देणेबाबत सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर अर्जदार हिने वकीलांना सांगून मी त्यावर अंगठा केला. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हिचे लग्न जाबदेणार क्र. १ यांच्या दारात झाले. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाचा सर्व खर्च जाबदेणार क्र. १ यांच्या आईवडीलांनी केला.

७. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही तिच्या सासरी लग्नानंतर १५—२० दिवस व्यवस्थित नांदली. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांच्या लग्नाच्या वेळेस जाबदेणार यांचे घर एकत्र कुटूंब व्यवस्थेतील होते. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हिचे माहेर कळंब हे वालचंदनगर पासून एक किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वालचंदनगर हे सुधारित शहर आहे. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार क्र. १ यांचे गाव पेडगाव असून वाडया वस्त्यांचे ग्रामीण गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे अर्जदार हिस सासरी करमत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यांचे एकत्र कुटूंब असल्यामुळे अर्जदार ही विभक्त राहणेकरिता सासरी वाद घालत असे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे अर्जदार ही घरात स्वयंपाक बनवत नसे तसेच स्वत:ही उपाशी झोपत असे. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार क्र. १ यांचे उजवे हाताला बोटे नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगते की, एक बोट वाकडे आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३/०४/२०१३ रोजी अर्जदार हिस अपत्य झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस जाबदेणार क्र. १ व त्यांचे कुटूंबिय भेटणेकरिता आलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस जाबदेणार क्र. १ यांचा भाऊ अर्जदार हिस नेणेकरिता तिच्या माहेरी आलेले होते.

९. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिचे आईवडीलांना बागायत जमिन आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिच्या आईवडीलांचे वार्षिक

उत्पन्न १०—१२ लाख इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे.

प्रश्न: अर्जदार यांची परिस्थिती हलाखीची असताना त्यांच्या आईवडीलांनी लग्नामध्ये अडीच लाख कसा काय केला?

उत्तर: मुलीचे लग्न आहे म्हणून त्यांनी गुरे—ढोरे विकून खर्च केला.

**१०.** मी जनावरे विकल्याच्या पावत्या न्यायालयात दाखल करू शकत नाही. मी अडाणी असल्यामुळे तसेच सर्व आर्थिक व्यवहार माझे मयत पती नामे हनुमंत यांनी केलेले असल्याने सोन्याच्या पावत्या मी अभिलेखावर दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, लग्नामध्ये काय दिले घेतले याबाबत मला वैयक्तिक माहिती नाही.

**११.** हे मला माहित आहे की, या अर्जदार यांनी जाबदेणार क्र. १ यांचेविरूध्द बारामती न्यायालयात घटस्फोटाचा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटस्फोटाच्या अर्जामध्ये अशी तडजोड झाली की, जाबदेणार क्र. १ हे त्यांच्या भावापासून वेगळे राहिल्यानंतर अर्जदार या पुन्हा नांदावयास येतील. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर जाबदेणार क्र. १ यांना पाऊणेतीन एकर जमिन आणि बंगला दिला व अर्जदार या पुन्हा नांदावयास गेल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सात आठ दिवस अर्जदार या व्यवस्थित राहिल्या परंतु करमत नसल्याने वाद घालणेस सुरूवात केली. हे म्हणणे खरे नाही की, वेगळे राहणेकरिता अर्जदार यांनी खोटे फौजदारी खटले जाबदेणार क्र. १ यांचे विरूध्द केले.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.01.04 18:24:06 +0530

(जे. एन. भस्मे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर
दिनांक ०४/०१/२०२५